GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI
8th Floor, New Excelsior Building, A.K.Nayak Marg, Fort, Mumbai-400001. (M.S.)
E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org Phone - 022-22016157/59/53/34/19/28

State CET Cell/ AGRI_CAP_Updated_Schedule_2020_2021/722 Date: 22-03-2021

# परिपत्रक

**विषय:- कृषी विद्यापीठांतर्गत पदवी प्रवेश प्रक्रिया २०२०-२१**

**(जागेवरील प्रवेश फेरी आणि संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशाचे वेळापत्रक व कार्यपध्दती.)**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि. ९/१२/२०२० पासून सुरु झालेली आहे. याअंतर्गत सर्व ऑनलाईन प्रवेश फेऱ्या राबविण्यात आलेल्या आहेत. कृषी व पदुम विभाग, अधिसूचना दि. १५/३/२०२१ अन्वये जागेवरील प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती सुधारीत करण्यात आलेली आहे. यानुसार जागेवरील प्रवेश फेरी संबंधित महाविद्यालयस्तरावर राबवावयाची आहे. यास्तव पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०२०-२१ मधील 'परिशिष्ट एच' आणि 'परिशिष्ट आय' मधील कार्यपध्दती व प्रवेश प्रक्रिया केंद्र रद्द करण्यात येत आहेत.

जागेवरील प्रवेश फेरी आणि संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश फेऱ्यानंतर रिक्त असलेल्या जागांचा तपशिल, अंतिम प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणांचा तपशील तसेच जागेवरील प्रवेश फेरीकरिता पात्र उमेदवारांच्या गुणवत्ता यादीची संकेतस्थळावर प्रसिध्दी. | २४/०३/२०२१ (सायं.५.३० नंतर) |
| २ | संबंधित महाविद्यालयाच्या ठिकाणी प्रवेश फेरीचा कालावधी. (दि. २६ व २७ /०३/२०२१ रोजी रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया तसेच दि. २८/०३/२०२१ रोजी जागांच्या रूपांतरासह प्रवेश प्रक्रिया) | २६/०३/२०२१ ते २८/०३/२०२१ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ३ | संस्थास्तरीय कोटयातील जागा संबंधित महाविद्यालयस्तरावर भरण्याचा कालावधी | २९ ते ३१/०३/२०२१ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ४ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०४/२०२१ |
| ५ | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | ०५/०४/२०२१ |

**महाविद्यालयाच्या मुख्यालयी जागेवरील प्रवेश फेरी (महाविद्यालयीन फेरी दि. २६ ते २८/३/२०२१) तसेच संस्थास्तरीय कोटयातील जागांवरील प्रवेशाबाबत महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. जे उमेदवार राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेशित आहेत, असे उमेदवार या प्रवेश फेरीमध्ये समाविष्ट होण्यास पात्र नाहीत.

२. संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन, उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या कालावधीत उपस्थित राहावे.

३. महाविद्यालयांनी उपस्थित उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करावी व सूचना फलकावर (दुपारी २.०० वाजेपर्यंत) प्रसिध्द करावी. ही गुणवत्ता यादी फक्त संबंधित दिवसासाठी ग्राह्य असेल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी करावी.

४. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मधील प्रवेश कार्यपध्दतीनुसार महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया राबवावी.

५. उमेदवारांनी आवश्यक त्या शुल्काव्यतिरिक्त – जागा स्वीकृती शुल्क म्हणून रू.१०००/- संबंधित महाविद्यालयांकडे जमा करावे. संबंधित महाविद्यालयांनी सदर जागा स्वीकृती शुल्काची एकत्रित रक्कम दि. ०१/०४/२०२१ रोजी महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे जमा करावी.

६. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दररोज प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत विहित प्रपत्रात महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगइनद्वारे दाखल करावी. यासाठी मे. महाआयटी, मुंबई यांनी महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये आवश्यक ती सुविधा करावी.

७. महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मे. महाआयटी, मुंबई हे दररोज रिक्त जागांचा तपशील अद्ययावत करून दररोज सायंकाळी ६.३० वाजता संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

८. प्रवेशाविषयी इतर कार्यपध्दती व नियम पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार असतील.

९. **महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भात शंका असल्यास त्यांनी दूरध्वनी क्र.०२२-६१३१६४०१ वर संपर्क साधावा.**

१०. सदर परिपत्रक www.mahacet.org / www.mcaer.org / https://cetcelladmissions.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**-सही/-**
**(चिंतामणी जोशी)**
**आयुक्त,**
**राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष**